महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ ०३ जून २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३३५ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पत्रकार हवे आहेत

दैंनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी पत्रकार नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com

# पालिका निवडणुकीत वरिष्ठांचा आदेश पाळा !

## कार्यकर्त्यांनो प्रभाग रचनेकडे लक्ष द्या - रवींद्र चव्हाण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**महापालिका निवडणूक महायुतीमध्ये लढायची किंवा स्वबळावर याबाबतचा निर्णय पक्षाचे केंद्रीय आणि राज्य पातळीवरील नेत्यांकडून घेतला जाईल. त्यानुसार त्यांच्या आदेशाचे पालन केले जाईल. कार्यकर्त्यांनी प्रभाग रचना, मतदार नोंदणीमध्ये लक्ष देण्याच्या सूचना त्यांना दिल्या आहेत, असे भाजपचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सोमवारी सांगितले.**

भाजपकडून पश्चिम महाराष्ट्रातील पक्षाचे जिल्हाध्यक्ष आणि प्रमुख पदाधिकारी यांच्यासाठी बाणेर येथे कार्यशाळेचे आयोजन केले होते. त्यावेळी रवींद्र चव्हाण यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी पक्षाचे शहराध्यक्ष धीरज घाटे, महामंत्री राजेश पांडे आदी उपस्थित होते. भाजपकडून पश्चिम महाराष्ट्रातील पक्षाचे जिल्हाध्यक्ष आणि प्रमुख पदाधिकारी यांच्यासाठी बाणेर येथे कार्यशाळेचे आयोजन केले होते. त्यावेळी रवींद्र चव्हाण यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी पक्षाचे शहराध्यक्ष



धीरज घाटे, महामंत्री राजेश पांडे आदी उपस्थित होते. राज्यात आता हळूहळू स्थानकि स्वराज्य संस्था निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. आगामी महापालिका निवडणुकीसाठी सर्वच पक्षांकडून आता तयारी सुरू झाली आहे. बुथ लेव्हलपर्यंत पक्ष मजबूत करण्यासाठी सर्वच पक्ष कामाला लागले आहेत. त्यात आता महापालिका निवडणुकीसाठी महायुती आणि महाविकास आघाडीतील प्रमुख पक्ष काय भूमिका घेतात, याचीही सर्वांना उत्सुकता आहे.

याच पार्श्वभूमीवर महापालिका निवडणूक महायुतीमध्ये लढायची किंवा स्वबळावर याबाबतचा निर्णय पक्षाचे केंद्रीय व राज्य पातळीवरील नेत्यांकडून घेतला जाईल. त्यानुसार त्यांच्या आदेशाचे पालन केले जाईल. कार्यकर्त्यांना प्रभाग रचना, मतदार नोंदणीमध्ये लक्ष देण्याच्या सूचना दिल्या आहेत." असे भाजपचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सोमवारी सांगितले आहे.

याशिवाय रविंद्र चव्हाण यांनी, "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने मागील ११ वर्षात अनेक महत्त्वाची कामे केली. देशाच्या अर्थव्यवस्थेला जगात चौथ्या स्थानावर आणले, लवकरच आपली अर्थव्यवस्था तिसऱ्या स्थानावर झेप घेईल.रस्ते, रेल्वेचे जाळे व्यापक केले, पायाभूत सोई सुविधा वाढविल्या.मोदी यांनी केलेला संकल्प सिद्धीस नेण्याचे काम केले आहे. त्यांनी केलेली कामे सर्वसामान्य जनतेपर्यंत घेऊन जाण्याच्या सूचना पदाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. असंही यावेळी सांगितलं. तसेच जागतिक योग दिन, जागतिक पर्यावरण दिनानिमित्त १५ ऑगस्ट पर्यंत वृक्षारोपण करणे अशा कार्यक्रमाद्वारे आम्ही केंद्र व राज्य सरकारच्या योजना जनतेपर्यंत घेऊन जाणार आहोत. तसेच काँग्रेसने आणलेल्या आणीबाणीचा दिवस २५ जून हा काळा दिवस आहे, त्यांनी संविधानाचा अपमान कसा केला, हेही लोकांना आम्ही सांगणार आहोत." असं यावेळी रविंद्र चव्हाण म्हणाले.

### फडणवीसांच्या आदेशानुसारच कार्यकर्ते काम करतील

या कार्यक्रमात बोलताना रविंद्र चव्हाण म्हणाले, "मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यासह राज्यातील अनेक मोठ्या शहरातील प्रलंबित प्रश्न सोडविले आहेत, या शहरामध्ये पायाभूत सोयीसुविधा निर्माण करण्याचे काम केले आहे, त्यामुळे महापालिका निवडणुकीत फडणवीस यांच्या आदेशानुसारच कार्यकर्ते काम करतील, फडणवीस यांच्यासह केंद्रातील नेते महायुती किंवा स्वबळावर निवडणूक लढायची याबाबत निर्णय घेतील. कार्यकर्त्यांनी प्रभाग रचनेवर लक्ष द्यावे."

थोडक्यात महत्वाचे

### डोंबिवलीतील नाले आणि गटारींवरील बांधकामे जमीनदोस्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली - डोंबिवली पूर्वेतील आयरे गाव प्रभाग हा उंच, सखल भूभाग आहे. या भागात पावसाळ्यात कोठेही पाणी तुंबू नये म्हणून गटार, नाल्यांची पाहणी करत असताना ग प्रभागाच्या प्रभारी साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांना आयरे गाव हद्दीत गटार, नाले बुजवून बेकायदा चाळी उभारल्याचे निदर्शनास आले. त्यांनी तातडीने तोडकाम पथकाला पाचारण करून गटार, नाल्यांचे प्रवाह बुजवून उभारलेल्या बेकायदा चाळी जेसीबीच्या साहाय्याने भुईसपाट केल्या. मुसळधार पाऊस सुरू झाला की कोपर पूर्व रेल्वे स्थानक, भोपर, आयरे प्रभागात हरितपट्ट्यांवर मागील पंधरा वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या बेकायदा चाळी, इमारतींमुळे आयरे गाव परिसर नेहमीच पुराच्या पाण्याखाली जातो. आपल्या प्रभाग हद्दीत कोठेही पाणी तुंबणार नाही. सखल भाग असेल तर तेथे पाणी साचणार नाही, नाले, गटारांमधील पाणी सळसळ वाहून जाईल यादृष्टीने उपाययोजना करण्याचे निर्देश आयुक्त अभिनव गोयल यांनी प्रभागातील साहाय्यक आयुक्तांना दिले आहेत.

### ठाण्यात कोरोना रुग्णांची शंभरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : शहरात 'कोरोना' ची शंभरी पार झाली असल्याने आरोग्य यंत्रणेचे टेन्शन वाढले आहे. त्यामुळे ठाणेकरांनो सावधान... कोविडने शहरात पुन्हा एकदा शिरकाव केला असला तरी नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क राहावे, आरोग्याची योग्य काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे. गेल्या आठवड्यापासून ठाण्यात दोन आकडी रुग्ण कोरोनाबाधित असताना आज अचानक रुग्णसंख्येत वाढ झाली आहे. ठाण्यात आज 5 रुग्ण आढळले असून आतापर्यंत 108 कोरोनाबाधित रुग्णांची नोंदणी झाली आहे. यामध्ये 16 जणांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यापैकी 13 खासगी तर 3 जणांवर कळवा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. कोरोनाच्या महाभयंकर राक्षसाने पुन्हा डोके वर काढण्यास सुरुवात केली आहे. उच्चभ्रू वस्तीसह झोपडपट्टी भागात कोरोनाने पुन्हा हात पाय पसरायला सुरुवात केली असल्याने चिंता व्यक्त करण्यात येत आहे. त्यातच मागील आठवड्यात मुंब्यातील एका रुग्णाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. त्यामुळे जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणादेखील सतर्क झाली असून सिव्हिल तसेच कळवा रुग्णालयात विशेष कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. 59 रुग्णांचे पाच दिवसांचे गृह विलगीकरण पूर्ण झाले असून 32 रुग्ण गृह विलगीकरणात आहेत. विशेष म्हणजे सर्वांची प्रकृती स्थिर असल्याचे प्रशासनाने स्पस्ट केले आहे.

# भिवंडीतील बोरीवली गावात एटीएसचा छापा

## पंधरा जण ताब्यात



दै. ठाणे जीवनदीप वार्ता
राजेश दळवी

पडघा दि. २ : दहशतवादी कारवायांसाठी चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील बोरीवली गावात काही घरांवर मुंबई एटीएसने छापा घालुन काही संशईतांना ताब्यात घेऊन चौकशी केल्याचे समजते. मिळालेल्या माहितीनुसार भिवंडी तालुक्यातील पडघ्या जवळील बोरिवली गावातील दहशतवादी साकिब नाचनच्या घरावर महाराष्ट्र एटीएस व ठाणे ग्रामीण पोलीसांनी छापा टाकून सर्च ऑपरेशन केले तर गावातील इतर घरावरही छापा टाकून काही संशयितांना ताब्यात घेऊन चौकशी केली. मात्र किती जंणाना ताब्यात घेऊन कारवाई केली हे अद्याप अस्पष्ट असुन ही कारवाई रविवार मध्यरात्री पासुन सुरु होती तर सोमवारी सकाळपासून एटीएस व ठाणे ग्रामीण पोलीस पोलीसांच्या २५ ते ३० चारचाकी गाड्यांचा ताफा कारवाईसाठी बोरिवलीतील दाखल झाला होता. तर एटीएस व ठाणे ग्रामीणच्या प्रमुख अधीकाऱ्यासंह दंगल नियंत्रण पथक, राज्य राखीव पोलीस दल, ठाणे ग्रामीण पोलीस असे २०० ते २५० जवान तैनात करण्यात आले होते. त्यामुळे बोरीवली गावाला पोलीस छावणीचे स्वरुप आले होते. यापुर्वी सुध्दा २०२३ मध्ये दहशत व देशविरोधी कारवायांबद्दल मुंबई बॉम्बस्फोटातील शिक्षा भोगून आलेला दहशतवादी साकीब नाचण त्याचा मुलगा शमील नाचण व बोरीवली गावातील १५ तरुणांना एनआयए ने मोठ्या प्रमाणात कोम्बींग ऑपरेशन राबवत ताब्यात घेतले होते. त्यावेळी सुध्दा संपूर्ण बोरीवली गावाला पोलिसांचा वेढा देण्यात आला होता. त्यानंतर पुन्हा एकदा रवीवारी मध्य रात्रीपासून मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र एटीएस व ठाणे ग्रामीण पोलीसांनी छापेमारी करत सर्च ऑपरेशन राबविल्याने बोरीवली गांव पुन्हा एकदा दहशतवादी कारवायांसाठी चर्चेत आल्याचे दिसत आहे. तर या सर्च ऑपरेशन मुळे परीसरात उलट सुलट चर्चेला उधाण आले होते.

## जमीन, पाणी व रोजगारासाठी
# शहापुरमध्ये आदिवासींचा मोर्चा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :** शेतकरी आणि शेतमजुरांचे प्रश्न, वनहक्क, पाणीपुरवठा, रोजगार, कर्जमाफी अशा अनेक मागण्यांसाठी अखिल भारतीय किसान सभेच्या नेतृत्वाखाली शहापुर तालुक्यातील आदिवासी बांधवांनी शहापुर तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढला. या पूर्वी देखील मोर्चे आणि आंदोलन करून देखील जनतेचे प्रश्न सुटले नसल्यामुळे प्रशासनाला जागे करण्यासाठी हा मोर्चा आयोजित करण्यात आला असल्याचे आंदोलनकर्त्यांकडून सांगण्यात आले.



शहापुर तालुक्यातील जलजीवन मिशन अंतर्गत रखडलेली कामे पूर्ण करावीत, वनपट्टे धारकांना सरकारी योजनेचा लाभ मिळावा, अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या घरांना नुकसान भरपाई मिळावी, आदिवासींना दिलेल्या प्लॉटवर झालेले अतिक्रमण हटवावे, वनपट्टे धारकांना सातबारा मिळावा, पेसा कायद्यानुसार रिक्त पदांची तातडीने भरती व नागरी सुविधा पुरवाव्यात, शेती व पिण्यासाठी धरणांचे पाणी शेतकऱ्यांना मिळावे, शेतकरी व शेतमजुरांना कर्जमाफी मिळावी, अंगणवाडी इमारतींचे बांधकाम पूर्ण करून आहाराचा दर्जा सुधारावा, बेलनाळा ते दहिगाव रस्त्याचे काम तातडीने सुरु करावे, विद्युत पुरवठ्याचा प्रश्न तातडीने सोडवावा, तालुक्यातील ७२ गावांवरील हरितक्षेत्र कायदा रद्द करावा अशा विविध मागण्या या मोर्चादरम्यान आदिवासी बांधवांनी मांडल्या.

मोर्चाच्या प्रतिनिधींनी तहसीलदार परमेश्वर कासुळे यांची भेट घेऊन सर्व मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी कासुळे यांनी तालुकास्तरावरील मागण्या तातडीने सोडवण्याचे आश्वासन दिले असून उर्वरित मागण्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवून लवकरात लवकर त्या मार्गी लावण्यात येतील, असे सांगितले.

### कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणूक
# छाननी अंती १५४ पैकी १४ अर्ज बाद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीची संचालक पदाची निवडणूक 29 जून रोजी होणार असुन अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी 154 उमेदवारांनी अर्ज दाखल झाले होते. सोमवार 2जून रोजी छाननी अंती 14अर्ज बाद झाल्याने 140 उमेदवार निवडणूक रिंगणात असून अर्ज मागे घेण्याच्या 3 जून ते 17जून पर्यंत कालावधीत किती उमेदवार अर्ज मागे घेतात. त्यानंतरच निवडणूक रिंगणात किती उमेदवार असतील हे चित्र स्पष्ट होईल. कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक पदाच्या एकूण 18 जागा असुन त्या मध्ये शेतकरी सेवा सोसायटी मतदार संघ 11 जागा, ग्रामपंचायत मतदार संघ 4 जागा, व्यापारी 2, हमाल माथाडी एक जागा हे मतदार संघ आहेत. तर 18 जुन रोजी उमेदवारांना निशाणी वाटप व 29 जुन रोजी मतदान व त्याच दिवशी मतमोजणी होणार आहे. महाराष्ट्र मध्ये प्रसिद्ध असलेली कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती असून बाजार समितीवर महायुती कि महाविकास आघाडीचा झेंडा फडकणार हे लवकरच समजेल.

# इस्त्रोमध्ये झळकणार शहापूर तालुक्याचा झेंडा

## शिरगांव गावातील सुजाता मडके हिची इस्त्रो मध्ये शास्त्रज्ञ म्हणून निवड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :** शहापूर तालुक्यातील शिरगांव गावातील सुजाता रामचंद्र मडके हिची इंडियन रिसर्च सेंटर (इस्त्रो) मध्ये शास्त्रज्ञ म्हणून निवड झाली आहे. सुजाताच्या संशोधनातून शहापूर तालुक्याचा झेंडा आता इस्त्रोमध्येही झळकणार आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालय ठाणे येथील सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक पदाचा राजीनामा देऊन भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्त्रो) बेंगलुर (कर्नाटक) येथे शास्त्रज्ञ (राजपत्रित अधिकारी) या पदावर सुजाता रुजू झाली आहे. इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण शिरगांव जिल्हा परिषद शाळेत झालेल्या सुजाताचा प्रवास प्रेरणादायी आहे. सुजाताने शहापूर येथील ग. वि. खाडे विद्यालयात माध्यमिक शिक्षण पूर्ण करुन नंतर तिने (आयआयटी) खरगपूर येथे मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशनच्या कार्यक्रमांतर्गत व्हर्च्युअल लॅब प्रोजेक्ट ३ मध्ये रिसर्च इंजिनिअर म्हणून काम केले



आहे. त्यापुर्वी सुजाताची सहाय्यक अभियंता म्हणून महाजेन्को मध्ये निवड झालेली होती. संरक्षण संशोधन आणि विकास संघटना (डीआरडीओ) मध्ये सायंटिस्ट बी पदाच्या मुलाखतीपर्यंत आणि भाभा अणु संशोधन केंद्र (बीएआरसी), ट्रॉम्बेच्या टेक्निकल ऑफिसर पदाच्या मुलाखतीपर्यंत तिने धडक मारलेली आहे. तसेच महाराष्ट्र लोक सेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेत यश संपादन करुन प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) ठाणे येथे सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक या पदावर कार्यरत होती. दरम्यान नुकतेच ती भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्त्रो), बेंगळुरूमध्ये सायंटिफिक ऑफिसर (एसओएससी) या पदावर रुजू झाली आहे.

इस्त्रोच्यावतीने सुजाताला मिळालेल्या संधीचा वडील म्हणून सार्थ अभिमान आहे. ग्रामीण भागात राहून केवळ प्रचंड मेहनत ,जिद्द व ध्येय बाळगल्यास निश्चित यशापर्यंत पोहोचता येते असे सुजाताचे वडील रामचंद्र मडके यांनी म्हटले आले. निश्चितच शहापूरसाठी देखील ही अभिमानाची गोष्ट आहे.

**मला इथंपर्यंत पोहोचता आले याचा मला आनंद आहे. शाळा, महाविद्यालयातील शिक्षकांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन अतिशय महत्त्वाचे होते. आई-वडिल माझ्यामागे ठामपणे उभे राहिले. त्यांनी केलेले संस्कार व मार्गदर्शन यामुळेच मला इस्रोपर्यंत पोहोचता आले.**

○ सुजाता रामचंद्र मडके









# गीतासार



## अध्याय १२
## भक्तियोगः

यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः । हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो यः स च मे प्रियः ॥ १२-१५ ॥

ज्याच्यापासून कोणत्याही जीवाला उद्वेग होत नाही तसेच ज्याला कोणत्याही जीवाचा उद्वेग होत नाही, जो हर्ष, मत्सर, भीती आणि उद्वेग इत्यादींपासून मुक्त असतो, तो भक्त मला प्रिय आहे. ॥ १२-१५ ॥

अनपेक्षः शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः । सर्वारम्भपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः ॥ १२-१६ ॥

ज्याला कशाची अपेक्षा नाही, जो अंतर्बाह्य शुद्ध, चतुर, तटस्थ आणि दुःखमुक्त आहे, असा कर्तृत्वाचा अभिमान न बाळगणारा माझा भक्त मला प्रिय आहे. ॥ १२-१६ ॥

यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न काङ्क्षति । शुभाशुभपरित्यागी भक्तिमान्यः स मे प्रियः ॥ १२-१७ ॥

जो कधी हर्षयुक्त होत नाही, द्वेष करीत नाही, शोक करीत नाही, इच्छा करीत नाही, तसेच जो शुभ व अशुभ सर्व कर्मांचा त्याग करणारा आहे, तो भक्तियुक्त पुरुष मला प्रिय आहे. ॥ १२-१७ ॥

समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः । शीतोष्णसुखदुःखेषु समः सङ्गविवर्जितः ॥ १२-१८ ॥

जो शत्रू-मित्र आणि मान-अपमान यांविषयी समभाव बाळगतो, तसेच थंडी-ऊन, सुख-दुःख इत्यादी द्वंद्वांत ज्याची वृत्ती सारखीच राहते, ज्याला आसक्ती नसते ॥ १२-१८ ॥

तुल्यनिन्दास्तुतिर्मौनी सन्तुष्टो येन केनचित् । अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः ॥ १२-१९ ॥

ज्याला निंदा-स्तुती सारखीच वाटते, जो ईशस्वरूपाचे मनन करणारा असतो, जो जे काही मिळेल त्यानेच शरीरनिर्वाह होण्याने नेहमी समाधानी असतो, निवासस्थानाविषयी ज्याला ममता किंवा आसक्ती नसते, तो स्थिर बुद्धी असणारा भक्तिमान पुरुष मला प्रिय असतो. ॥ १२-१९ ॥

# किमान १० जूनपर्यंत पावसात घट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : बदललेल्या वातावरणामुळे मॉन्सूनच्या प्रवासाची गती कमी होण्यास सुरुवात झाली, असल्याने मान्सूनचा प्रवास पूर्णपणे रखडला आहे. किमान 10 जूनपर्यंत तरी मॉन्सूनचा प्रवास थांबणार असल्याचा अंदाज आहे, ज्यामुळे यादरम्यान केवळ पश्चिम किनारपट्टी आणि राज्यातील काही भागात प्रामुख्याने हलका पाऊस पडण्याचा अंदाज आहे. राज्यातील बहुतांश भागात मात्र कोरडे हवामान अपेक्षित आहे, ज्यामुळे कमाल तापमानात वाढ होईल. विदर्भात 40 अंशापर्यंत कमाल तापमान राहण्याची शक्यता आहे तर मराठवाडा आणि खानदेशात कमाल तापमान 35 ते 40 अंशामध्ये राहील. या कोरड्या हवामानाचा वाईट परिणाम पेरणी

### शेतकऱ्यांनी पेरणीची घाई न करण्याचे आवाहन

आणि लागवडीवर होण्याची शक्यता आहे. कोणत्याही खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवून शेतकऱ्यांनी (प्रामुख्याने कोरडवाहू) पेरणी आणि लागवडीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

# कल्याणमध्ये भुयारी मलनिस्सारण वाहिन्यांचे पाणी रस्त्यावर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : कल्याणातील मुख्य रस्त्यावर अंडर ग्राउंड ड्रेनज लाईनच्या चेम्बरची झाकणे खाली दबली गेली असून त्या चेम्बरमधून दुर्गंधी युक्त प्रक्रिया न केलेले सांडपाणी वाहत असल्याने नागरी आरोग्यासह संभाव्य रोगराईचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

कल्याण पश्चिमेतील राजा हॉटेल परिसरात केडीएमसी मुख्यालया पासून हाकेच्या अंतरावर असलेल्या शंकरराव चौक ते टिळक चौककडे जाणाऱ्या रस्त्यावर अंडर ग्राऊंड ड्रेनज लाईनच्या चेम्बरचे झाकण 17 मे रोजी तुटल्यामुळे दुर्गंधी युक्त सांडपाणी रस्त्यावर वाहत आहे. या संदर्भात कल्याण डोंबिवली मनपामध्ये दक्ष नागरिक योगेश मोकाशी यांनी तक्रार केली होती. तरी देखील केडीएमसी प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याने संभाव्य रोगराई पसरण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

"क" प्रभाग क्षेत्र अंतर्गत येणाऱ्या शंकरराव चौक ते टिळक चौक रस्त्यावर वाहनासह करदात्यां नागरिकांची वर्दळ असते. रस्त्यावर वाहत असलेल्या दुर्गंधी युक्त सांडपाण्यातून त्यांना ये जा करावी लागते हे दुर्दैव म्हणावे लागेल. मनपा क्षेत्रात अंडर ग्राउंड ड्रेनज लाईनच्या माध्यमातून सांडपाणी, मलयुक्त घाण मलनिस्सारण केंद्रापर्यंत नेत प्रक्रिया करून सांडपाणी बागा, इतर तत्सम कामासाठी वापर करण्याचे प्रशासनाचे नियोजन असते. परंतु अंडर ग्राऊंड चेम्बरची झाकणे तुटून चेंबरांच्या तुंबापुरीमुळे रस्त्यावर सांडपाणी वाहत असेल आणि त्यावर कारवाई होत नाही, म्हणजे नागरिकांच्या जीवनाशी खेळ चाललेला असल्याचे चित्र यानिमित्ताने दिसत आहे.

हीच परिस्थिती ब प्रभागक्षेत्र अंतर्गत येणाऱ्या पौर्णिमा चौक ते प्रेम ऑटो मुरबाड रोड या मुख्य रस्त्यावर रोशन पेट्रोल पंपासमोर अंडर ग्राऊन्ड चेम्बरचे झाकण खचल्याने मोठ्या प्रमाणात दुर्गंधी युक्त सांडपाणी वाहत असून यातच मेट्रोच्या कामामुळे रस्ता अरूंद झाला असून वाहनांची प्रचंड वर्दळ यातून जीव मुठीत धरून पादचाऱ्यांना दुर्गंधी युक्त सांडपाण्यातून वाट काढत चालवी लागत आहे. यात या परिसरात खाजगी हॉस्पिटलची संख्या आणि येणाऱ्या रूग्णांना देखील यांचा फटका बसत आहे. सांडपाण्यातून चालत गेल्यामुळे रोगराईला आमंत्रण दिल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे.

"अधिकारी सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, भुयारी मलनिस्सारण वाहिन्या सफाई ठेकेदाराला निलंबित केले असून, या कामासंदर्भात नवीन नविदा काढण्यात आल्या. प्रतिवर्षासाठी 3 कोटी 60 लक्ष रू तरतूद असून यामध्ये ठेकेदाराने 1 सक्शन वाहन, 2 जेटिंग वाहने, 4 ग्रॉफ बकेट वाहने आदींच्या सहाय्याने चोक अँप आदी काम करणे अपेक्षित असते. असे असून पूर्वी भुयारी मलनिस्सारण वहिन्या सफाई साठी आठ गाड्या उपलब्ध होत्या. सद्यस्थितीत दोन गाड्या उपलब्ध असल्याने भुयारी मलनिस्सारण वहिन्या सफाई कामावर ताण निर्माण झाला आहे."

# डोंबिवली मराठा मंदिर सभागृहात दाखले वाटप शिबीर संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



डोंबिवली(शरद शहाणे) : भारतीय जनता पार्टी कार्यकारी अध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाने आणि तहसीलदार कार्यालय कल्याण यांच्या सौजन्याने डोंबिवली पश्चिमेत दहावी बारावी च्या विद्यार्थ्यांना शासकीय शैक्षणिक दाखले वाटपाचा कार्यक्रम दिनांक 2 जून ते चार जून सकाळी आठ वाजेपासून सायंकाळी पाच वाजेपर्यंत डोंबिवली पश्चिमेकडील मराठा मंदिर हॉल मराठा हितवर्धक मंडळ महात्मा फुले रोड, येथे आयोजित केले आहे.

दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन प्रवेशा करता लागणारे सर्व प्रकारचे दाखले म्हणजेच उत्पन्नाचा दाखला, डोमेसाईल, रहिवासी, नॉन क्रिबिलि यर दाखले सर्व एका छत्राखाली सहजरीत्या उपलब्ध करून दिले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा वेळ ,आणि पैसा देखील वाचतो. सदर कार्यक्रम साईनाथ मित्र मंडळ डोंबिवली मानाचा जाधव वाडी चा महाराजा संस्थेचे अध्यक्ष दिनेश रमेश जाधव आणि त्यांच्या अनेक कार्यकर्त्यांच्या मेहनतीने संपन्न होत आहे.

# खारघर येथील पथदिव्यांचा प्रश्न मार्गी

## राष्ट्रवादीच्या रमझान शेख यांच्या पुढाकाराला यश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : अवकाळी झालेल्या पावसामुळे खारघर येथील फरशीपाडा सेक्टर ३४ ए, ३४ बी येथील रस्त्यावरील दिवे निकामी झाले होते. २-३ दिवस नागरिकांना रस्त्यावर अंधार सोसावा लागत असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी रमझान शेख यांच्या लक्षात येताच तत्काळ रात्रीच महाराष्ट्र राज्य वीज मंडळ, खारघर कार्यालयात संपर्क साधून विजेची समस्या सोडवण्यासाठी आवाहन केले.

लोकांची होणारी गैर सोय लक्षात येताच जास्त वेळ वाया न घालवता महाराष्ट्र राज्य वीज मंडळ, मधील इलेक्ट्रिशियन संजू पाटील आणि गणेश पाटील लगेच जागेवर येऊन रस्त्यावरील दिव्यांचा दोष शोधून दिवे चालू करून दिले. यावेळी समाजसेवक समीर शेख देखील मदतीस उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य वीज मंडळ यांनी वेळ वाया न घालवतात तात्काळ सहकार्य करून रस्त्यावरील दिवे चालू करून देण्यास जी तत्परता दाखवली त्याबद्दल रमझान शेख यांनी त्यांचे आभार मानले.

# तासिका पदासाठी शिक्षक भरती अर्ज सादर करण्याचे आवाहन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय विभागांतर्गत रायगड जिल्हयात सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालयाच्या अधिनस्त अनुसूचित जाती/नवबौध्द मुलांकरिता शासकीय निवासी शाळा, जावळी, ता. माणगांव येथे शासकीय निवासी शाळा कार्यान्वीत आहे. येथे इयत्ता 6 वी ते 10 वी साठी तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्वावर 6 महिने किंवा नियमित शिक्षक हजर होईपर्यंत खालील विषयांकरिता तासिका तत्वावर सहाय्यक शिक्षक या पदासाठी पात्र व इच्छूक उमेदवारांनी आपले अर्ज Bio-Data/Resume आवश्यक शैक्षणिक अर्हताचे कागदपत्रे अनुसूचित जाती/नवबौध्द मुलांकरिता शासकीय निवासी शाळा, जावळी, ता.माणगांव येथे सादर करावेत, असे आवाहन सहायक आयुक्त समाज कल्याण सुनिल जाधव यांनी केले आहे.

पदाचे नाव सहाय्यक शिक्षक (प्राथमिक), शैक्षणिक पात्रता H.Sc./B.A./B.Sc./D.Ed., विषय--, आवश्यक पद संख्या 03. सहाय्यक शिक्षक (माध्यमिक), शैक्षणिक पात्रता B.A.B.Ed. विषय हिंदी, आवश्यक पद संख्या 01. सहाय्यक शिक्षक (माध्यमिक) शैक्षणिक पात्रता B.A.B.Ed., विषय(इतिहास/भुगोल), आवश्यक पद संख्या 01.

अटी व शर्ती :- या पदावर घड्याळी तासाप्रमाणे शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या मंजूर दरानुसार मानधन देय राहील. सदर एकत्रित मानधना व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही. उमेदवारांची निवड करतांना अनुभव तसेच TET परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांना प्रधान्य देण्यात येईल. प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक पात्रता, अनुभव इ. अहर्ता किमान असून, किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलविण्याकरिता पात्र असणार नाही. सेवा प्रवेश नियम आणि शासनाकडून तदनंतर वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा तसेच कार्यनियमावलीतील तरतुदींनुसार भरती प्रक्रिया राबविण्यात येईल. सदर पदे मानधन/तासिका तत्वावर असून, भरती प्रक्रियेचे संपूर्ण अधिकार, पदे कमी जास्ती करणे, भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करणे अटी व शर्तीमध्ये बदल करणे, सदरील पदे कधीही कोणताही कारण न देता समाप्त करण्याचे अधिकार सहाय्यक आयुक्त समाज कल्याण रायगड, अलिबाग यांनी राखून ठेवलेले आहेत.

# पावात सापडली लाकडाची शिळकी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



पालघर : "भूमिपुत्र विकास फाउंडेशनची पालघर जिल्हा अन्न व औषध प्रशासनाकडे लेखी तक्रार."

वाडा शहरातील भाजी मार्केट परिसरातील एका वडा पाव विक्रेत्याकडून घेतलेल्या पावा मध्ये लाकडाची शिलकी मिळून आली असताना, भूमिपुत्र विकास फाउंडेशनच्या पदाधिकारी यांनी सदर बाब वडापाव विक्रेते यांच्या निदर्शनास आणून दिली असता. सदर पाव हे निहरूनगर वाडा येथील महाराष्ट्र बेकरी येथून आणले असल्याची माहिती मिळून आली.

सदर बेकरी व्यवसायाकडे विचारणा केली असता, सदर बेकरी मध्ये लाकडाची भट्टी असून, भट्टीतील लाकडाचा एखादा तुकडा उडून पाचमध्ये उडाला असावा असे सांगण्यात आले.

वाडा शहरात अशा प्रकारच्या घटना वारंवार घडत असल्याचे ऐकायला मिळत असून, असे घडत असलेले प्रकार अत्यंत गंभीर असून. यामध्ये कोणाचाही जीव जाण्याची शक्यता नाकारता येऊ शकत नाही, त्यामुळेच या प्रकरणाची गंभीर दखल घेत भूमिपुत्र विकास फाउंडेशन चे अध्यक्ष - शेखर पवार यांनी या घटनेची तक्रार वाडा नगरपंचायत, वाडा तहसील कार्यालय तसेच अन्न व औषध प्रशासन विभाग, पालघर यांना लेखी निवेदन देऊन बेकरी व्यवसायिकावर कारवाई करण्याची मागणी केलेली आहे.

# आयएमए तर्फे रिक्षा चालकांची वैद्यकीय तपासणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : आयएमए कल्याणतर्फे रविवारी जागतिक तंबाखू विरोध दिन साजरा करण्यात आला. कल्याणच्या रिक्षा चालकांसाठी मोफत वैद्यकीय आणि दंत तपासणी आणि कर्करोग, हृदयविकार आणि तंबाखू सोडण्यासाठी नाशमुक्ती वर व्याख्यान घेण्यात आले. रिक्षाचालक संघटनेचे अध्यक्ष प्रणव पेणकर हे प्रमुख पाहुणे होते. आयएमए अध्यक्षा डॉ सुरेखा ईटकर, खजिनदार डॉ तन्वी शाह, डॉ अमित धर्माधिकारी मानसोपचारतज्ञ, डॉ विकास सुरंजे, डॉ प्रकाश देशमुख, डॉ मनोज पाटील, डॉ अतुल पाटील, कान नाक घसा तज्ञ, डॉ अमित घाणेकर कर्करोगतज्ञ, डॉ जयंत गीते हृदयविकारतज्ञ, डॉ वृणाली अहिरे, डॉ तृप्ती बोबडे दंतचिकित्सक ह्यांनी रिक्षाचालकांना मार्गदर्शन केले.


जीवनदीप महाविद्यालय गोवेली, कल्याण

मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त

प्रवेश सुरू (२०२५•२६)

बारावीनंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी

-बीएएमएमसी-

(बॅचलर ऑफ मल्टीमीडिया अँड मास कम्युनिकेशन)

-पात्रता-

कोणत्या शाखेतून बारावी उत्तीर्ण

- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -

टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅग्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी.

- प्रवेशासाठी संपर्क -

९४२१०५९३९६

goveli_jssp@rediffmail.com

www.jeevandeepcollegegoveli.in

MASS MEDIA


# पेण पोलिसांकडून बांगलादेशींना अटक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



पेण : पेण पोलीस ठाणे हद्दीत मौजे तरणखोप गावचे हद्दीत बांगलादेशी नागरिक असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्याने त्याबाबत कायदेशीर कारवाई करणेबाबत पेण पोलीस निरीक्षक यांचेकडून सूचना मिळाल्या होत्या. त्यानुसार पेण पोलीस स्टेशन पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून कारवाई केली असता सदर ठिकाणी दोन बांगलादेशी नागरिक आपले वास्तव्य लपवून अनधिकृतपणे वास्तव्य करत असताना आढळून आले. त्यांचेकडे चौकशी केली असता ते बांगलादेशी नागरिक असल्याची खात्री पटल्याने त्याबाबत पेण पोलीस ठाणे येथे जसिमोद्दीन अबुल कासिम काझी, वय ४९ वर्ष, रा.मोहन सखाराम पाटील यांची चाळ, अमृत बेकरी जवळ, तरणखोप ता.पेण जि. रायगड, मूळ रा. बगुरा,पो.अभयपूर, जिल्हा झेणाईदा, बांगलादेश तसेच लिली खातून खुरशीद अली, वय 43 रा.मोहन सखाराम पाटील यांची चाळ, अमृत बेकरी जवळ, तरणखोप, ता.पेण, जि. रायगड, मूळ रा. नवारोन, पो. जादोबपुर,देश-बांगलादेश यांचे विरुद्ध गुन्हा रजिस्टर नंबर 101/2025 परकीय नागरिक अधिनियम 1946 चे कलम 14 सह परकीय नागरिक आदेश 1948 नियम 3(1) सह पारपत्र (भारतात प्रवेश)नियम 1960 चा नियम 3,6 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदरची कारवाई आंचल दलाल, पोलीस अधीक्षक,रायगड, अभिजीत शिवथरे,अप्पर पोलीस अधीक्षक,रायगड, गजानन टोम्पे, उपविभागीय पोलीस अधिकारी पेण यांच्या मार्गदर्शनाखाली संदीप बागुल,पोलीस निरीक्षक पेण पोलीस ठाणे व निलेश राजपूत सहाय्यक पोलीस निरीक्षक पेण पोलीस ठाणे यांच्या सूचनेनुसार पेण पोलीस ठाणे पोलीस उपनिरीक्षक समद बेग, पोलीस उपनिरीक्षक प्रतीक पोकळे, संतोष जाधव, प्रकाश कोकरे, सतीश पाटील, अजिंक्य म्हात्रे, भूपेश वेळे सुषमा भोईर स्वरा पाटील, अमोल म्हात्रे, तलवारे यांनी केली आहे.सदर बाबत पोलीस उपनिरीक्षक प्रतीक पोकळे यांनी पेण पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक समद बेग हे करत आहेत.


जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित

जीवनदीप महाविद्यालय, गोवेली

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली

मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त

११ वी व १२ वी

कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)

UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.

POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography

Admission Open 2025-2026

आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज

आजच आपला प्रवेश निश्चित करा!

7775851123, 8108559566

9619188558


## रेसिपी

# प्रोटीनयुक्त सोयाची भाजी



**साहित्य :**

सोया चंक्स, १ कांदा ,१ टोमॅटो, कोथिंबीर, मीठ, साखर, २,लसुण पाकळया, गरम मसाला, तेल

**कृती :**

रात्री सोयाबीन पाण्यात भिजत घालावे

सकाळी पाण्यातून काढून पिळून घ्यावे.कांदा टोमॅटो मीठ साखर लसूण गरम मसाला मिक्सर मधून बारीक वाटावा

फोडणी करायला तेल टाकून राई व कडीपत्ता टाका. व मिक्सर मधुन वाटण घालून तेल बाजूला होईल इतके परता.नंतर त्यात सोया चंकस टाका. मिक्स करा. १५ मिनिटे शिजवा.

मसाला सोया चंक ल लागेल. रस्सेदर प्रोटीन असलेली भाजी तयार पोळी बरोबर झकास लागते.



## आजचे राशिभविष्य

**मेष**

समाजातील उच्चपदस्थ आणि प्रतिष्ठित लोकांशी संपर्क वाढतील. स्वतःवर विश्वास ठेवा. फळ क्षेत्राशी संबंधित लोकांना व्यवसायात फायदा होईल.

**वृषभ**

व्यवसायावर लक्ष केंद्रित करा. अन्यथा, व्यवसायातील अस्थिरतेमुळे तोटा होऊ शकतो. विद्यार्थ्यांन अभ्यासाकडे नीट लक्ष द्यावे.

**मिथुन**

तुम्हाला शासन आणि सत्तेचा फायदा मिळेल. राजकारणात तुमचे स्थान आणि प्रतिष्ठा वाढेल. तुम्हाला काही महत्त्वाच्या कामात यश मिळेल.

**कर्क**

व्यवसायात संयमाने आणि परिश्रमाने काम करा. तुमच्या व्यवसायात प्रगती आणि उन्नती होईल.तुमचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी, नियमित व्यायाम करा.

**सिंह**

तुमच्या आयुष्यात असे काही घडू शकते जे तुम्ही कधीही स्वप्नातही पाहिले नसेल. कामाच्या ठिकाणी कनिष्ठ कर्मचाऱ्यांमुळे मतभेद होऊ शकतात.

**कन्या**

कोणाच्याही फसवणुकीत अडकू नका. तुमच्या बुद्धिमत्तेने आणि विवेकबुद्धीने काम करा. सामाजिक कार्यात रस कमी होईल.

**तूळ**

व्यवसाय क्षेत्रात गुंतलेल्या लोकांना चढ-उतारांचा सामना करावा लागेल.पोट आणि हाडांशी संबंधित आजारांची विशेष काळजी घ्या.

**वृश्चिक**

जर तुम्हाला अपघातात दुखापत झाली किंवा दुखापत झाली तर योग्य उपचार करून घ्या. परदेश प्रवास किंवा स्थलांतराचे संकेत आहेत. मोठ्या

**धनु**

कामांचे विचार मनात येत राहतील. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या लोकांना दूरच्या देशांमध्ये आणि परदेशात जाण्याची संधी मिळेल.

**मकर**

तुमच्या महत्त्वाकांक्षा जास्त वाढू देऊ नका. आईकडून आर्थिक मदत मिळण्याची शक्यता आहे. तुमचा आत्मविश्वास वाढेल

**कुंभ**

मालमत्ता खरेदी-विक्रीशी संबंधित बाबींमध्ये तुमच्या जवळच्या मित्रांकडून सहकार्य मिळेल. या बाबतीत कोणताही घाईघाईने निर्णय घेऊ नका.

**मीन**

आर्थिक परिस्थिती सुधारेल. महत्त्वाच्या कामात यश मिळेल. स्वादिष्ट जेवणाचा योग आहे. तुम्ही लांबच्या प्रवासाला जाऊ शकता. महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील.


news.thanejeevandeep@gmail.com

दैनिक ठाणे जीवनदीप WhatsApp Channels

महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)

9619188558 / 9082664781

www.jeevandeepvarta.com/

आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# महाराष्ट्रात कोरोनाचं कमबॅक !



## जानेवारीपासून आतापर्यंत राज्यात ११ हजार ५०१ नमुने तपासले आहेत. ज्यात ८१४ कोरोना रुग्ण आढळले. त्यातील एकट्या मुंबईत ४६३ रुग्ण समोर आले होते

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** - महाराष्ट्रात कोविड १९ च्या रुग्णांमध्ये वेगाने वाढ होताना दिसत आहे. रविवारी राज्यात कोरोनाचे नवीन ६५ रुग्ण आढळले आहेत. त्यातील मुंबईत २२, पुण्यात ९, ठाण्यात ६, पिंपरी-चिंचवडमध्ये २, कोल्हापूर आणि नागपूर येथे १ रुग्ण आढळल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली आहे. राज्यात कोरोनाने पुन्हा डोके वर काढले असले तरी दिलासादायक चित्र म्हणजे ३०० कोरोना रुग्ण उपचारानंतर बरे झाले आहेत. सध्या राज्यात सक्रीय कोरोना रुग्णांची संख्या ५०६ इतकी आहे.

जानेवारीपासून आतापर्यंत राज्यात ११ हजार ५०१ नमुने तपासले आहेत. ज्यात ८१४ कोरोना रुग्ण आढळले. त्यातील एकट्या मुंबईत ४६३ रुग्ण समोर आले होते. जानेवारीपासून आतापर्यंत एकूण ८ जणांचा कोरोनामुळे मृत्यू झाला आहे. त्यातील ७ रुग्ण गंभीर आजाराने ग्रस्त होते. मृतांमध्ये पहिल्या रुग्णाला हायपोकेल्सेमिया आणि नेफ्रोटिक सिंड्रोम आजार होता. दुसरा रुग्ण कॅन्सरग्रस्त होता. तिसऱ्या रुग्णाला स्ट्रोक होता. चौथ्या रुग्णाला डायबिटिक किटोएसिडोसिस आजाराने पीडित होता.

देशात कोरोना रुग्ण किती? देशात कोरोना रुग्णांच्या संख्येत सातत्याने वाढ दिसत आहे. सक्रीय रुग्ण संख्या ३ हजारांवर पोहचली आहे. रविवारी सकाळपर्यंत देशात ३७५३ सक्रीय रुग्ण होते. त्यातील बहुतांश केरळमधील आहेत. केरळमध्ये १३३६ सक्रीय रुग्ण आहेत. डिसेंबर २०१९ मध्ये जगात कोरोना व्हायरसचा शिरकाव झाला होता. सर्वात आधी चीनच्या वुहान शहरात कोरोना रुग्ण सापडला. त्यानंतर अतिशय वेगाने हा व्हायरस जगभरात पसरला. मार्च २०२० मध्ये कोरोना महामारी म्हणून जागतिक आरोग्य संघटनेने घोषित केली. दरम्यान, भारतात कोरोना व्हायरसचा पहिला रुग्ण ३० जानेवारी २०२० मध्ये केरळमधील त्रिशुर येथे सापडला. इथल्या २० वर्षीय विद्यार्थिनीला जी चीनच्या वुहानमधून भारतात परतली होती ती कोरोना पॉझिटिव्ह आढळली होती. त्यानंतर देशात कोरोना पसरत गेला. एप्रिल २०२० मध्ये देशात वेगवेगळे कोरोना रुग्ण आढळले. भारतात २०२० मध्ये कोरोनाची पहिली लाट आली. त्यावेळी देशात २४ मार्च २०२० मध्ये २१ दिवसांचा लॉकडाऊन लागू केला होता.

# बीएमडब्ल्यूमधून दरोडा

## भिवंडी पोलिसांसांकडून चार दरोडेखोरांना अटक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**भिवंडी :** दरोडा घालण्यासाठी चक्क महागड्या बीएमडब्ल्यू कारमधून आलेल्या चौकडीवर भिवंडीच्या शांतीनगर पोलिसांनी झडप घातली. त्यांच्याकडून चार बंदुका, लोखंडी कटावणी, लोखंडी रॉड अशी जीवघेणी शस्त्रे आणि मिरची पूड व दोरखंड असे साहित्य हस्तगत केले. शोएब शेख (23), नौशाद खान (22), अफ्ताब शेख (21), शहाबुद्दीन अन्सारी (20) अशी त्यांची नावे आहेत. हे सर्व दरोडेखोर बिहारमधील असून त्यांना न्यायालयात हजर केले असता 4 जूनपर्यंत पोलीस कोठडी ठोठावण्यात आली आहे. शांतीनगर पोलीस ठाण्याचे तपास पथक मध्यरात्री गस्त घालत असताना वंजारपट्टी नाका परिसरातील शानदार मार्केट येथे एका कारमध्ये काही व्यक्ती बसल्याचे व त्यांच्या हालचाली संशयास्पद असल्याची खबर पोलीस शिपाई प्रशांत बर्वे यांना मिळाली. त्यांनी ही माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांना दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक (गुन्हे) अतुल अडुरकर, पोलीस निरीक्षक (प्रशासन) विनायक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश चोपडे, योगेश गायकर, पोलीस कर्मचारी रिझवान सय्यद, नीलेश महाले, लक्ष्मण सहारे, प्रशांत बर्वे, रोशन जाधव, दीपक सानप, भूषण पाटील यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली.

# फेरीवाल्यांनी गिळंकृत केले दिवा शहरातील पदपथ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**दिवा :** बेकायदा बांधकामाचे माहेरघर असलेल्या दिव्यात आता अनधिकृत फेरीवाल्यांनी फुटपाथ गिळले असल्याचे समोर आले आहे. बेकायदा फेरीवाल्यांनी फुटपाथवर बिनधास्तपणे कब्जा करून हातगाडी, स्टॉल उभारून बस्तान मांडले आहे. महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडे वारंवार तक्रारी करूनदेखील प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने सर्वसामान्य नागरिकांना चालायचे कुठून, असा प्रश्न पडला आहे. बेकायदा फेरीवाल्यांचा प्रश्न दिवसेंदिवस वाढत आहे. मुंब्रादेवी कॉलोनी येथील स्थानिक नागरिकांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) दातिवली शाखेला भेट देत फुटपाथवर चालण्यासाठी जागा नसल्याची समस्या मांडली. यावेळी विधानसभा संघटक योगिता नाईक यांनी तत्काळ प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्तांची भेट घेऊन निवेदन देत फेरीवाल्याचा कायमचा बंदोबस्त करण्याची मागणी केली. दरम्यान सहाय्यक आयुक्तांनी दखल घेत सकारात्मक प्रतिसाद दिला. तसेच फेरीवाल्यांवर कारवाईचे आश्वासन दिले.




# जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रवेश घेतल्यास घरपट्टी माफ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड :** विद्यार्थी व पालकांचा ओढा इंग्रजी शाळेकडे वाढत चालल्याने मराठी शाळा ओस पडू लागल्या आहेत. मात्र मायमराठी वाचवण्यासाठी चौकमधील ग्रामस्थांनी पुढाकार घेतला असून जिल्हा परिषदेच्या मराठी शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यास घरपट्टी माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसा एकमुखी ठरावच चौकमधील नावंढे ग्रामपंचायतीने ग्रामसभेत घेतला आहे. या ठरावाचे रायगड जिल्ह्यातील मराठीप्रेमींनी स्वागत केले असून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषदेच्या मराठी शाळांमध्ये प्रवेश घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

नावंढे ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये जिल्हा परिषदेच्या एकूण चार शाळा आहेत. नावंढे शाळा पहिली ते पाचवीपर्यंत असून नावंढेवाडीमधील शाळा पहिली ते चौथीपर्यंत आहे. कांढरोली येथील शाळा पहिली ते सातवी तर घोडीवलीवाडी येथील शाळा पहिली ते चौथीपर्यंत आहे. इंग्रजीच्या आकर्षणामुळे गेल्या काही वर्षांपासून या शाळांची पटसंख्या कमी झाली. त्यामुळे मराठी शाळांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. जास्तीत जास्त विद्यार्थी मराठी शाळांकडे आकर्षित व्हावे यासाठी नावंढे ग्रामपंचायतीने नामी युक्ती शोधून काढली.

ग्रामस्थांनी मंजूर केलेल्या ठरावाचा लाभ नावंढे ग्रामपंचायत हद्दीतील नावंढे, नावंडेवाडी, कांढरोली, घोडीवलीवाडी येथील जिल्हा परिषदेच्या चार शाळांना होणार आहे. दरम्यान मराठी शाळा वाचवण्याबरोबरच पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठीदेखील ग्रामपंचायतीने पुढाकार घेतला आहे. ज्या महिला पाच झाडे लावून त्याचे संगोपन करतील अशांना पैठणी देऊन सन्मानित केले जाणार आहे. पुरुषांनी झाडे लावली तर त्यांचाही आकर्षक ड्रेस देऊन सत्कार करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती पर्यावरणप्रेमी किरण हाडप यांनी दिली.

# टायर कारखान्यांमुळे वडवली गावकऱ्यांचे आरोग्य धोक्यात

## पालकमंत्र्यांचे आदेश धाब्यावर

## प्रदूषण नियंत्रण मंडळाला चुना लावून रात्रीच्या अंधारात चालतात कारखाने

## प्रदूषणकारी कारखान्यांना रात्रीचा दिवस !



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाडा :** वडवली ग्रामपंचायत हद्दीमध्ये थाटण्यात आलेल्या टायर कंपन्यांनी परिसरातील गावकऱ्यांचे आरोग्य अक्षरशः चिरडून टाकले आहे. याची दखल घेऊन पालकमंत्र्यांनी दहा प्रदूषणकारी कारखाने बंद करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर कारखाने बंदही करण्यात आले. मात्र हे आदेश धाब्यावर बसवून, प्रदूषण नियंत्रण मंडळाला चुना लावून हे कारखाने दिवसा बंद आणि रात्री सुरू असल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे प्रदूषण नियंत्रण महामंडळ आणि राज्य सरकार करते तरी काय, असा संतप्त सवाल विचारण्यात येत आहे.

विविध प्रकारच्या प्रदूषणकारी कारखान्यांमुळे वाडावासीयांचे आरोग्य आधीच धोक्यात आले असताना त्यात टायर कंपन्यांमधील 'रबर पायरोलिसिस'ची भर पडली होती. ही प्रक्रिया चुकीच्या पद्धतीने तसेच सर्व नियम धाब्यावर बसवून होत असल्याने असंख्य गावकऱ्यांची फुफ्फुसे निकामी झाली आहेत. त्यातील काही जणांना तर कॅन्सरचा धोका असून ज्येष्ठ नागरिकांना श्वसनाचे विकार जडले आहेत. कारखान्यांमधून निघणारा धूर व धुळीमुळे ग्रामस्थ अक्षरशः हैराण झाले होते. फेब्रुवारी महिन्यामध्ये एम. डी. पायरोलिसेस या कंपनीत बॉयलरचा स्फोट झाला आणि यात संपूर्ण कंपनी जळून खाक झाली. त्यात दोन कामगार व त्यांची दोन मुले ठार झाले. तेव्हा बेकायदेशीरपणे सुरू असलेले दहा प्रदूषणकारी कारखाने बंद करण्यात आले. तरीदेखील आदेशाची पायमल्ली करत हे सर्व प्रदूषणकारी कारखाने रात्री सुरू असल्याचे येथील ग्रामस्थ कल्पेश पाटील यांनी उघडकीस आणले आहे.



# मुंबई अहमदाबाद महामार्गाच्या कामावर पालकमंत्री गणेश नाईक यांचा तीव्र संताप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई:** मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर काम पूर्ण होण्या आधीच पडलेले खड्डे, सातत्याने निर्माण होणारी वाहतूक कोंडी याबाबत पालकमंत्री गणेश नाईक यांनी तीव्र संताप व्यक्त करीत अधिकाऱ्यांची चांगलीच कान उघडणी केली आहे. विकसित होणाऱ्या पालघर जिल्ह्याच्या दृष्टीने हे काही योग्य नाही असेही त्यांनी यावेळी सांगितले.

वसई विरार शहराच्या पूर्वेच्या भागातून गुजरात व मुंबईला जोडणारा राष्ट्रीय महामार्ग गेला आहे. दळणवळणाच्या दृष्टीने हा महामार्ग अत्यंत महत्वाचा समजला जातो. दररोज येथून मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. मात्र मागील काही वर्षांपासून या राष्ट्रीय महामार्गावर विविध प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. नुकताच या रस्त्याचे काँक्रिटीकरणाचे काम करण्यात आले आहे. मात्र अवघ्या वर्षभरातच या रस्त्याची अवस्था दयनीय बनली आहे.

रस्ते अपघात, वाहतूक कोंडी अशा विविध समस्यांना येथील नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. याबाबत सोमवारी राज्याचे वनमंत्री व पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाचा पाहणी दौरा केला. यावेळी खासदार डॉ हेमंत सवरा, जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड, महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार, आमदार राजन नाईक व इतर अधिकारी व भाजप पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी पाहणी दौऱ्या दरम्यान रस्त्यावर निर्माण होत असलेल्या समस्यांच्या बाबत त्यांनी आढावा घेत असतानाच या भागातील नागरिकांना विविध अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. महामार्गावर खड्डे, पाणी साचण्याची समस्या, वाहतूक कोंडी या सर्व समस्यांच्या संदर्भात संबंधित विभागाची बैठक घेऊन योग्य त्या उपाययोजना करण्यात याव्यात अशा सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना केल्या आहे.

# उल्हासनगरमध्ये कचऱ्याचे ढीग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** 'शून्य कचरा शहर' ही घोषणा करणाऱ्या उल्हासनगर महानगरपालिकेचे प्रत्यक्ष चित्र अत्यंत विरोधाभासी आणि धक्कादायक आहे. खडीमशीन डम्पिंग ग्राऊंड क्षमतेपलीकडे भरल्यामुळे आता तिथून कचरा ओसंडून वाहत आहे, तर दुसरीकडे शहरभर दुर्गंधी, घाण आणि ढीग साचल्याने नागरिक त्रस्त आहेत. लाखो रुपयांची जाहिरात, कोट्यवधींचा कचरा व्यवस्थापन ठेका आणि तरीही गल्लीगल्लीत साचलेला कचरा... हा विरोधाभास आता लोकांच्या नजरेत येऊ लागला आहे.

उल्हासनगरच्या खडीमशीन परिसरातील डम्पिंग ग्राऊंडवर सध्या इतका मोठा कचऱ्याचा साठा झाला आहे की, वाहनांना प्रवेश देखील

## कोट्यवधींचा ठेका देऊनही शून्य कचरा' संकल्पनेचा बोजवारा

अवघड होऊ लागला आहे. ठेकेदार कोणार्क एन्व्हायर्नमेंट कंपनीकडून डम्पिंग साइटवर अत्यंत धीम्या गतीने प्रक्रिया केली जात असून, दररोज निर्माण होणाऱ्या सुमारे ४०० मॅट्रिक टन कचऱ्याची विल्हेवाट लावली जात नाही. त्यामुळे शहरात इतरत्र कचऱ्याचे ढीग उभे राहत आहेत.

उल्हासनगर शहरातील कॅम्प ४ आणि ५ हे भाग कचऱ्याचे 'हॉटस्पॉट' ठरत असून, रस्त्यांच्या कडेला ढीग पडले आहेत. उग्र वास, डासांचा त्रास आणि अस्वच्छतेमुळे नागरिक हैराण झाले आहेत. काही ठिकाणी तर रस्त्यावरून चालणेही कठीण झाले आहे. घंटागाड्यांचे वेळेवर न येणे, नियमित उचल न होणे आणि विल्हेवाट न लावणे या त्रिसूत्रीने परिस्थिती बिघडली आहे.

# भाईंदर रेल्वे स्थानकात सरकते जिने कार्यान्वित



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :-** भाईंदर रेल्वे स्थानकाच्या पश्चिम बाजूस रेल्वे प्रशासनाने नवे सरकते जिने (एस्केलेटर) उभारले असून, त्यामुळे वयोवृद्ध, दिव्यांग तसेच सर्वसामान्य प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. भाईंदर रेल्वे स्थानकावरून दररोज हजारो प्रवासी ये-जा करतात. त्यामुळे प्रवाशांच्या सोयीसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यावर रेल्वे प्रशासनाचा भर आहे. त्याअंतर्गत पश्चिम भागात नव्या सरकत्या जिन्याची उभारणी करण्यात आली असून, गुरुवारी हे जिने प्रवाशांच्या वापरासाठी अधिकृतपणे खुले करण्यात आले. यापूर्वी पश्चिम भागात सरकते जिने उपलब्ध नसल्यामुळे प्रवाशांना जिन्यांने चढ उतार करून प्रवास करावा लागत होता. विशेषतः वयोवृद्ध आणि अपंग प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. परिणामी, अपंगांसाठी असलेल्या लिफ्टचा वापर सर्वसामान्य प्रवाशांकडून मोठ्या प्रमाणात केला जात होता. मात्र, नव्या सरकत्या जिन्यामुळे आता प्रवाशांची गैरसोय कमी होणार आहे. हे जिने खासदार नरेश म्हस्के यांच्या खासदार निधीतून उभारण्यात आले असल्याचा दावा शिवसेना पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आला आहे.

# मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीची धडक कारवाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

**नवी मुंबई:** मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या (एपीएमसी) दक्षता पथकाने विनापरवाना आणि सेस न भरता परदेशातून आयात करण्यात आलेल्या तूर डाळीच्या २०० कंटेनरवर मोठी कारवाई करत संबंधित आयातदारावर तब्बल १ कोटी ११ लाख ४८ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. गुरुवारी (२९ मे) रात्री मुंबई एपीएमसीच्या दक्षता पथकाकडून ही कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे अनधिकृत शेतमाल व्यापार करणाऱ्या आयातदारांमध्ये खळबळ उडाली आहे.

सदर तूर सुमारे ५,००० टन इतकी असून तिची एकूण अंदाजित किंमत ३४ कोटी ६० लाख रुपये आहे. ही तूर दुबई येथून मे. अग्लो कमोडीटीस FZE या कंपनीमार्फत आयात करण्यात आली होती आणि ती मे. नमहा इम्पोर्ट्स, मुंबई यांच्या नावे नावाशेवा येथील एका गोदामात उतरवण्यात आली होती. मात्र, या

## विनापरवाना , सेस न भरता आयात केलेल्या तूर डाळीच्या २०० कंटेनरवर दंडात्मक कारवाई

आयातदाराकडे बाजार समितीचा परवाना नव्हता तसेच कोणतीही पूर्वपरवानगी घेतलेली नव्हती.

२९ मे रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास मुंबई एपीएमसीच्या दक्षता पथकाने जेएनपीटी, तुर्भे, नेरुळ, ठाणे-बेलापूर रोड आणि नवी मुंबई परिसरात अनधिकृत शेतमाल वाहतुकीवर लक्ष ठेवताना उरणमधील वहाळ फाट्याजवळ एका कंटेनरची तपासणी केली. एमएच-४८-टी-८१५६ क्रमांकाच्या वाहनात परदेशातून आलेली तूर असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यावर कारवाई करण्यात आली. चौकशीत या मालाची कोणतीही नोंद बाजार समितीत नसल्याचे आणि कोणताही सेस किंवा देखरेख शुल्क न भरल्याचे स्पष्ट झाले.

सदर प्रकरणात महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन विकास व विनियमन अधिनियम, १९६३ च्या कलम ३२ (९अव ९क) अंतर्गत तीनपट दंडाची कारवाई करण्यात आली आहे. याशिवाय बाजार फी, देखरेख खर्च आणि इतर संबंधित शुल्कांची वसुलीही केली जाणार आहे, अशी माहिती एपीएमसी प्रशासनाकडून देण्यात आली आहे.



# बांधकामाच्या वादातून तरूणावर तलवारीने हल्ला

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : घराबाहेर शौचालय बांधण्याच्या वादातून एका तरुणावर तलवारीने प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची घटना कल्याण पश्चिमेतील उंबर्डे परिसरात घडली. विक्रांत जाधव असे या जखमी तरुणाचे नाव आहे. जाधव यांच्या शेजारी राहणाऱ्या गायकवाड कुटुंबातील तरुणांनी हा हल्ला केल्याचा आरोप विक्रांत जाधव आणि त्यांचे वडील विजय जाधव यांनी केला. विक्रांतवर कल्याणच्या रुक्मिणीबाई रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी खडकपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे. कल्याण पश्चिम उंबर्डे परिसरात विजय जाधव हे आपल्या कुटुंबासह राहतात. त्यांच्या शेजारीच गायकवाड कुटुंब राहते. विजय जाधव राहत असलेल्या घराच्या जागेवर गायकवाड कुटुंबीयांनी दावा केला असून या जागेवरून जाधव व गायकवाड कुटुंबात गेल्या अनेक वर्षांपासून वाद सुरू आहेत. विजय जाधव यांनी आपल्या घराशेजारी शौचालय बांधण्याचे काम सुरू केले होते. या कामाला गायकवाड कुटुंबाने विरोध केला. आठवडाभरापूर्वी हे काम सुरू असताना गायकवाड कुटुंब या ठिकाणी आले व त्यांनी हे काम बंद पडल्याचा आरोप विजय जाधव यांनी केला. तसेच गायकवाड कुटुंबियांनी त्यांना काम सुरू केल्यास जीवे ठार मारण्याची धमकी दिली. दोन लाख रुपयांची मागणी केल्याचा आरोप देखील विजय जाधव यांनी केला. रविवारी सकाळी विजय जाधव यांचा मुलगा विक्रांत जाधव हा घराशेजारील परिसरात पाणी आणण्यासाठी गेला असता, याच वेळेस विक्रांतला एकट्याला गाठून गायकवाड कुटुंबातील तरुणांनी विक्रांतवर तलवारीने हल्ला केला. या हल्ल्यात विक्रांत जाधव हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर कल्याणच्या रुक्मिणी बाई रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी खडकपाडा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आली असून पोलिसांनी पुढील तपास सुरु केला आहे.

## आसरा फाउंडेशन आणि भगवान भोर यांच्या संयुक्त विद्यमाने
# विद्यार्थ्यांचा गुणगौरव




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : आसरा फाउंडेशन आणि नाशिक जिल्ह्यातील जाणोरी गावातील सामाजिक कार्यकर्ते भगवान भोर यांच्या संयुक्त विद्यमानाने जाणोरी येथे विविध सामाजिक उपक्रमांचा त्रिवेणी संगम असलेला एक विशेष कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. या कार्यक्रमात गावातील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा, ५ जून पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम आणि १ जून रोजी वाढदिवस असलेल्या ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे गावातील दहावी व बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा. या सोहळयात विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच उत्तीर्ण न झालेल्या विद्यार्थांना मोहन शिरकर यांनी मार्गदर्शन केले. यामुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळाले असून भविष्यात अधिक चांगले कार्य करण्याची प्रेरणा मिळाली आहे. याचबरोबर, ५ जून रोजी असलेल्या 'पर्यावरण दिना'चे औचित्य साधून १०० झाडे लावून भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पर्यावरणाचे महत्त्व अधोरेखित करत, उपस्थितांनी पर्यावरणाच्या संवर्धनासाठी आपापला सहभाग नोंदवला. ही लावलेली झाडे भविष्यात जाणोरी गावाच्या हरितकरणासाठी महत्त्वाचा हातभार लावतील अशी अपेक्षा आहे. या कार्यक्रमाची आणखी एक विशेष बाब म्हणजे, १ जून रोजी वाढदिवस असलेल्या गावातील अनेक वरिष्ठ नागरिकांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ज्येष्ठ नागरिकांप्रती आदर व्यक्त करत, त्यांचा गौरव करण्यात आला. हा उपक्रम समाजात ज्येष्ठ नागरिकांच्या योगदानाला महत्त्व देणारा ठरला. या प्रसंगी आसरा फाउंडेशनचे मोहन शिरकर, सामाजिक कार्यकर्ते भगवान भोर, तसेच कनेक्ट कोर मल्टिक्रिएशनचे संचालक सागर भोर आदी मान्यवर उपस्थित होते. या मान्यवरांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांचे, ज्येष्ठ नागरिकांचे आणि पर्यावरणाचे महत्त्व अधोरेखित केले.

आसरा फाउंडेशन आणि भगवान भोर यांच्या या संयुक्त उपक्रमामुळे जाणोरी गावामध्ये सामाजिक एकोपा आणि सामुदायिक जबाबदारीची भावना अधिक दृढ झाली आहे आणि पर्यावरण बाबत विविध उपक्रम येणाऱ्या काळात करणार असल्याचे आसरा फाउंडेशनचे अध्यक्ष मोहन शिरकर यांनी सांगितले.

# मिरा भाईंदर शहरात 'हॅपी स्ट्रीट' उपक्रम

## - पर्यावरण, आरोग्य, कला आणि क्रीडा यांचा बहारदार संगम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : जागतिक पर्यावरण दिनाच्या (५ जून) पार्श्वभूमीवर, प्लास्टिक प्रदूषण निर्मूलनाच्या जागतिक मोहिमेला पाठिंबा देत 'हॅपी स्ट्रीट' या नाविन्यपूर्ण आणि जनजागृतीपर उपक्रमाची सुरुवात आज, रविवार दिनांक १ जून रोजी सकाळी ७ वाजता मिरारोड येथील जे.पी. इन्फ्रा कॉम्प्लेक्स जवळ मोठ्या उत्साहात करण्यात आली.

हा उपक्रम गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय तसेच पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय (MoEFCC) यांच्या निर्देशानुसार व मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आला. प्लास्टिक प्रदूषणाविषयी जनजागृतीसह आरोग्य, कला, क्रीडा, शिक्षण आणि मनोरंजन यांचा सुरेख मिलाफ या "हॅपी स्ट्रीट" च्या पहिल्याच पर्वात अनुभवायला मिळाला.

शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून हा उपक्रम यशस्वी केला. हास्य, व्यायाम, कला, खेळ, शास्त्रीय संगीत, बॉक्सिंग, किक बॉक्सिंग व झुंबा नृत्य अशा सकारात्मक कृतींनी हा उपक्रम वेगळा ठरवणारा ठरला.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदूषण निर्मूलन (Ending plastic pollution globally) हि थीम घेऊन १ ते ५ जुलै मधे प्लास्टिक बंदी बाबत विशेष जनजागृती करण्यात येणार आहे हैप्पी स्ट्रीट च्या माध्यमातून या जनजागृतीचा शुभारंभ आज करण्यात आला.

तात्विका इंटरटेनमेंट, ब्रँड कनेक्ट आणि हॅशटॅग ब्रँड एक्टिवेशन या संस्थांच्या सहकार्याने मिरा भाईंदर महानगरपालिकेने या अभिनव उपक्रमाचे यशस्वी आयोजन केले. कार्यक्रमावेळी आमदार नरेंद्र मेहता, अतिरिक्त आयुक्त डॉ. सचिन बांगर, वरील संस्थांचे पदाधिकारी, मनपा अधिकारी, कर्मचारी आणि शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कल्याण विकास फाउंडेशन आणि तहसील कार्यालय यांच्या वतीने
# दाखले वाटप शिबिराचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामिण(नरेंद्र पाटील) : भारतीय जनता पक्ष जुने कल्याण मंडळ, कल्याण विकास फाउंडेशन आणि कल्याण तहसीलदार कार्यालयाच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या मोफत शासकीय दाखले वाटप शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले. कल्याण पश्चिमेच्या अभिनव विद्यामंदिर शाळेमध्ये झालेल्या या शिबिराचा शेकडो नागरिकांनी लाभ घेतला. तत्पूर्वी या शिबिराला प्रारंभ करण्यापूर्वी भाजप कल्याण जुने मंडळ अध्यक्ष अमित धाक्रस आणि कल्याण विकास फाउंडेशनच्या अध्यक्ष हेमलता नरेंद्र पवार यांच्याकडून सरस्वती माता आणि छत्रपती शिवाजी महाराज यांना पुष्पहार अर्पण करून या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी पुढील प्रवेश प्रक्रियेसाठी शासकीय दाखले हे अत्यंत महत्त्वाचे समजले जातात. आणि ते वेळेमध्ये मिळणे तर आणखीनच अत्यावश्यक असते. या पार्श्वभूमीवर



भाजप कल्याण जुने मंडळ अध्यक्ष अमित धाक्रस, कल्याण विकास फाउंडेशनच्या अध्यक्ष हेमा नरेंद्र पवार यांनी पुढाकार घेत कल्याण तहसील कार्यालयाच्या माध्यमातून हा शासकीय दाखले वाटपाचा उपक्रम राबविला. ज्यामध्ये एकाच ठिकाणी स्थानिक वास्तव्य, डोमिसाइल आणि उत्पन्नाचा असे तीन महत्त्वाचे दाखले मोफत उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती आयोजक अमित धाक्रस आणि हेमलता नरेंद्र पवार यांनी दिली. ज्याला परिसरातील शालेय विद्यार्थी, त्यांचे पालक आणि इतर गरजू व्यक्तींनी मोठी गर्दी केली होती.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी भाजपा जुने कल्याण मंडल अध्यक्ष अमित धाक्रस, भाजपा जुने कल्याण मंडल महिला मोर्चा अध्यक्षा तथा कल्याण विकास फाऊंडेशन अध्यक्षा हेमलता नरेंद्र पवार यांच्या टीमने विशेष मेहनत घेतली. तर भाजपा नवीन कल्याण मंडल अध्यक्ष स्वप्निल काठे, जुने कल्याण मंडल सरचिटणीस विवेक वाणी, सदा कोकणे, अॅड.समृद्ध ताडमारे, गणेश काळन, एस एस जोशी, वैशाली परदेशी, शैलेश सातवी, रवि गुप्ता, देवस्थळी, जमशेद खान, संजय कारभारी, किशोर म्हसके, किशोर खैरनार, राजेश रजक, प्रविण हेंद्रे, दिपा शहा, प्रणव महाजन, निलेश राजे, सुनिल शेट्टी, उमेश पिसाळ, सुचित्रा होळकर आदींनी या शिबिराला उपस्थिती दर्शवली.

तर कल्याण तहसील कार्यालयातर्फे तलाठी कार्यालय योगेश पुराणिक, भास्कर पाटील, शरद बनसोडे, रियाज तांबोळी, अरुण पाटील आणि दीपाली दाभाडे या कर्मचाऱ्यांनी विनाविलंब हे सर्व दाखले उपलब्ध करून देण्याचे काम केले. त्याबद्दल आयोजकांकडून या कर्मचाऱ्यांचा सत्कारही करण्यात आला.

अत्यंत महत्त्वाच्या वेळी हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आल्याबद्दल या शिबिराचा लाभ घेतलेल्या संबंधित नागरिकांनी भाजपा जुने कल्याण मंडल अध्यक्ष अमित धाक्रस, भाजपा जुने कल्याण मंडल महिला मोर्चा अध्यक्षा तथा कल्याण विकास फाऊंडेशन अध्यक्षा हेमलता नरेंद्र पवार यांचे आभार मानले.

# मुरबाड सा बां विभाग उपअभियंता पदी संजय कोरडे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंता म्हणून संजय कोरडे यांची नियुक्ती झाली आहे.संजय कोरडे हे या पुर्वी जि.प.बांधकाम विभागाचे उपअभियंता म्हणून कार्यरत होते. मुरबाड सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता कैलास पंतिगराव हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा जागी संजय कोरडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

शाखा अभियंता ते उपविभागीय उपअभियंता अशा पद श्रेणीने शासकीय सेवेत कोरडे यांनी उत्कृष्ट काम केले असल्याने त्यांचा अनेक वर्षाचा बांधकाम क्षेत्रातील अनुभव मुरबाड तालुक्याला फायदेशीर होईल व तालुक्याच्या विकासाला गती मिळेल अशी चर्चा सर्वत्र होत आहे. अशा सर्व समावेशक,शांत स्वभाव असणार्या अधिकार्याला तालुक्यातून अनेक लोकप्रतिनिधी व ठेकेदारांनी तसेच त्यांच्या मित्र परिवाराने पदभार स्वीकारल्यावर त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# उद्या ठाण्याच्या काही भागात पाणी पुरवठा बंद

## टेमघर जलशुद्धीकरण केंद्रात अत्यावश्यक देखभालीची कामे होणार



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे महानगरपालिकेच्या स्वतःच्या पाणी पुरवठा योजनेतील टेमघर जल शुद्धीकरण केंद्रातील उच्च दाब उपकेंद्रातील पावसाळ्या पूर्वीची अत्यावश्यक देखभाल, कंट्रोल पॅनलची दुरुस्ती, ट्रान्सफॉर्मर ऑईल फिल्ट्रेशन आदी कामे बुधवार ०४ जून रोजी करण्यात येणार आहेत. त्यामुळे, बुधवार, ०४ जून रोजी स ९.०० ते रा. ९.०० या काळात १२ तासांसाठी पाणीपुरवठा बंद राहणार आहे. परिणामी, बुधवार ०४ जून रोजी स. ९.०० ते रा. ९.०० वाजेपर्यंत घोडबंदर रोड, वर्तक नगर, ऋतू पार्क, जेल, गांधी नगर, रुस्तमजी, सिध्दांचल, समता नगर, सिध्देश्वर, इंटरनिटी, जॉन्सन आणि कळव्याचा काही भाग येथे १२ तासासाठी पाणी पुरवठा पूर्णपणे बंद राहील. इतर भागात, स्टेम प्राधिकरणामार्फत येणारा पाणी पुरवठा झोनिंग करुन सुरू ठेवण्यात येणार आहे.

दरम्यान, पाणीपुरवठा पूर्व पदावर येईपर्यंत पुढील १ ते २ दिवस कमी दाबाने पाणी येण्याची शक्यता आहे. तरी, नागरिकांनी पाण्याचा योग्य तो साठा करुन ठेवावा, पाण्याचा अपव्यय करू नये, असे आवाहन ठाणे महानगरपालिकेने केले आहे.

# भिवंडी मनपा क्षेत्रात कॅन्सर जनजागृती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाने कॅन्सर आजाराबाबत जनजागृती आणि औषधोपचार वेळेत होण्याकरिता भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेच्या सहाकार्याने अवचित पाडा आणि म्हाडा कॉलनी या ठिकाणी दि. 30 व 31 मे रोजी कॅम्प आयोजित करण्यात आला होता.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या वतीने महिला आणि पुरुषांच्या मौखिक तपासणी, तर महिलांसाठी सर्वायकल आणि स्तन कर्करोग निदान व औषोधोपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उदघाटन भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे मा. अतिरीक्त आयुक्त श्री. विठ्ठल डाके यांच्या शुभहस्ते करण्यातआले.

या शिबीरादरम्यान अवचित पाडा येथे खालीलप्रमाणे तपासणी करण्यात आली.

ओरल कॅन्सर स्क्रीनिंग – 59
ब्रेस्ट कॅन्सर स्क्रीनिंग – 49
सर्वाइकल कॅन्सर स्क्रीनिंग – 35
बायप्सी रेफर फॉर सर्वाइकल कॅन्सर – 3
ओरल कॅन्सर रेफर - 1

तर म्हाडा कॉलनी येथे खालीलप्रमाणे तपासणी करण्यात आली.

ओरल कॅन्सर स्क्रीनिंग - 161
ब्रेस्ट कॅन्सर स्क्रीनिंग - 45
सर्वाइकल कॅन्सर स्क्रीनिंग -44
बायप्सी रेफर फॉर सर्वायकल कॅन्सर - 4
ओरल कॅन्सर रेफर - 2
ओरल कॅन्सर बाएफसी डन - 1

या कार्यक्रमासाठी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री. संदीप गाडेकर, इंदिरा गांधी स्मृती उप-जिल्हा रुग्णालयाच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. पंधारे मॅडम, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या क्षयरोग अधिकारी डॉक्टर बुशरा सैय्यद, महापालिकेचे वैद्यकीय अधिकारी, व इतर कर्मचारी उपस्थित होते. परिसरातील नागरिकांकडून सदर तपासणी शिबिराचा लाभ मोठ्या संख्येने घेण्यात आला.

# महावितरणच्या विरोधात ग्राहक आक्रमक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : तालुक्यात अनेक महिन्यांपासून कोणत्या ना कोणत्या भागात तासनतास वीज नसणे, महावितरणच्या अधिकारी - कर्मचाऱ्यांकडून वीज ग्राहकांना योग्य प्रतिसाद न देणे,लाईट असली तरी ती डीम असणे, सतत ट्रान्सफार्मर नादुरुस्त होणे, अवाजवी बिल येणे,कर्मचारी लाईट गेल्यावर कधीच जागेवर नसणे आदी बाबींचा जाब विचारण्यासाठी व्यापारी मंडळ,हॉटेल संघटना,छोटी बाजार संघटना व शिवसेना शहापूर तालूका कार्यकरणी व शहर शाखेचे पदाधिकारी तसेच शहापूर शहरातील त्रस्त नागरीक आज मंगळवारी दुपारी १२ वाजता निषेध सभेचे आयोजन करुन महावितरण कार्यलयात जाऊन जाब विचारणार असल्याची माहिती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहर प्रमुख विजय देशमुख यांनी सांगितले.




शहापूर शहरासह परिसरात दिवसेंदिवस लोकवस्ती वाढत असून नव-नवीन इमारतींचे बांधकाम तसेच नवीन व्यवसायांचे प्रमाण वाढले आहे.पर्यायाने विद्युत खपही वाढलेला आहे.परंतु त्या मानाने विद्युत वितरण प्रणालीमध्ये लोडच्या हिशोबाने ट्रान्सफार्मर,विद्युत सबस्टेशन उभारण्यात आले नसून बोटावर मोजण्याइतका कर्मचारी वर्ग असल्याने वीज ग्राहकांना सेवा पुरविण्यात अडथळा निर्माण होत आहे.तसेच जुन्या सप्लाय लाईनद्वारे सप्लाय दिला जातो. भरीस भर म्हणजे योग्य प्रकारे देखभाल दुरुस्ती करण्यास हलगर्जीपणा करणे,विद्युत सप्लायच्या मुख्य वीज प्रवाह तारा लोंबकळत असणे व त्यांना झाडांचा स्पर्श होणे. तसेच त्यांच्या खालील सेफ्टी गार्डतारा गायब होणे, ट्रान्सफार्मरला झाकण नसणे व त्यांची देखभाल दुरुस्ती करण्यास टाळाटाळ करणे आणि विशेष म्हणजे अनुभव नसलेल्या कर्मचारी वर्गावर जबाबदारी सोपवणे, पावसाळयात येणारी समस्या जसे झाडे पडणे,वीज तारा तूटणे,पोल पडणे यासाठी तातडीने समस्या सोडवल्या जातील अशी कोणतीही आपत्कालीन व्यवस्था सध्या तरी नाही.दरम्यान विद्युत वितरणच्या ढिसाळ कारभाराने शहापूरकर आतिशय त्रस्त असून कधी कार्यालयात फोन केला असता कर्मचारी फोन ऊचलत नाहीत. कर्तव्यावर असलेले कर्मचारी हजर नसल्याने खासगी कर्मचारी बोलावून लाईटचे काम करावे लागत असल्याची खंत विजय देशमुख यांनी प्रस्तुत प्रतिनिधिशी बोलतांना व्यक्त केली.

> **वादळी-वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी पोल पडले होते.ते दुरुस्तीचे काम सुरु आहे.यापुढे ट्री कटिंग अथवा दुरुस्तीचे काम सकाळी दहा ते संध्याकाळी पाच ऐवजी सकाळी दहा ते दुपारी दोनच्या दरम्यान केले जाईल.तसेच यापुढे मी स्वतः साईटवर थांबून काम करुन घेत जाईन.तसेच आमच्याकडे कर्मचाऱ्यांची कमतरता असून वरिष्ठ कार्यालयाकडे तशी मागणी केलेली आहे.** - यादव इंगळे, उपअभियंता,म.रा.वि.वि.कार्यालय,शहापूर.







# शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे

## - विभागीय आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : शिवराज्याभिषेक सोहळा कार्यक्रमाचे दुर्गराज रायगड येथे तारखेनुसार 6 जून व तिथीनुसार 09 जून रोजी आयोजन करण्यात येणार आहे. यावर्षी शिवराज्याभिषेक सोहळा साडेतीनशे वर्ष पूर्ण झाल्याने येथील कार्यक्रमाला शिवप्रेमी नागरिकांची लाखोच्या संख्येने उपस्थिती होणार असल्याने या कार्यक्रमांची पूर्वतयारी करताना संबंधित विभागांनी सूक्ष्म नियोजन करावे असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी यांनी दिले.

रायगड किल्ला येथे शिवराज्याभिषेक सोहळा 2025 च्या अनुषंगाने नियोजन बैठक संपन्न झाली यावेळी विभागीय आयुक्त श्री.सुर्यवंशी बोलत होते.

या बैठकीस जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल, अपर जिल्हाधिकारी सुनिल थोरवे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) रविंद्र शेळके, यासह विविध शासकीय विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री.सुर्यवंशी म्हणाले शिवराज्याभिषेक सोहळयासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून मोठ्या संख्येने शिवप्रेमी नागरिक रायगड येथे येत असतात या वर्षी होणाऱ्या सोहळा कार्यक्रमांसाठी आयोजकांकडून तयारी केली जात आहे. मागील वर्षी सुरक्षा व पायाभूत सुविधांवर मोठा ताण निर्माण झाला होता हा अनुभव लक्षात घेऊन यावर्षी कोणतीही समस्या उद्भवू नये या दृष्टीने आवश्यक त्या सुविधा निर्माण करण्यासाठी पूर्वतयारी केली जावी. येणाऱ्या नागरिकांच्या वाहनांचे पार्किंग,पिण्याचे पाणी, आरोग्य, स्वच्छता तसेच या कालावधीत आवश्यक असणाऱ्या विविध सुविधा उपलब्ध व्हाव्या यासाठी सूक्ष्म नियोजन करून कार्यवाही करावी असे विभागीय आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी यांनी सुचित केले. तसेच महाड व माणगाव मार्गे येणाऱ्या खाजगी वाहनांच्या वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी रस्त्यांची कामे, पार्किंगच्या जागा व तेथून गडाकडे जाणाऱ्या मार्गाची व्यवस्था संबंधित विभागांनी पूर्ण करावे तसेच आवश्यक ते माहिती देणारे फलक लावले जावेत असे सांगितले. मागील वर्षी झालेला सोहळयाबाबत केलेली कार्यवाही व यंदाच्या पूर्वतयारी बाबत विविध प्रमुख अधिकाऱ्यांनी माहिती सादर केली.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अॅड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024